सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय अधिकारी ( महसूल ) तथा उपविभागीय दंडाधिकारी कुडाळ**
तहसिलदार कार्यालय कुडाळ इमारत, पहिला मजला
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिनकोड ४१६ ५२०
दुरध्वनी क्र. ०२३६२ -२२३३२५ ईमेल - sdokudal@gmail.com

क्र. एनएपी/वा.बदल/एस.आर-०१/२०२४ दिनांकः- २३ जानेवारी, २०२४

वाचलेः- ०१. श्री लक्ष्मी व्हेंचर्स प्रा.लि. करिता संचालक श्री. राहूल शंकर पाटणकर, रा. लक्ष्मीवाडी, कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांचा दि. ०९.०३.२०२३ व २७.१२.२०२३ रोजीचा अर्ज

०२. उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडील आदेश क्र. एन.ए.पी/ ३४./एसआर - २९८६ / २००६, दि. २४.०४.२००६

०३. मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी, कुडाळ नगरपंचायत यांचेकडील बिल्डींग परमीट नं. ४२६, दि. ०८.०६.२०१७

०४. मंडळ अधिकारी, कुडाळ यांचेकडील दि. ०७.०१.२०२४ चे पत्र.

०५. मुख्याधिकारी, कुडाळ नगरपंचायत यांचेकडील पत्र जा.क्र.नपंकु / ८२ / २०२४, दि. ०९.०१.२०२४

०६. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४

०७. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८

०८. कार्यालयीन मंजूर टिपणी

आदेश -

उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये खालील नमुद मिळकतीमध्ये **निवासी बिनशेती** परवानगी देण्यात आलेली आहे.

| गाव / तालुका | जमीन मालकाचे नाव | स. नं./ हि. नं | क्षेत्र चौ. मी |
|---|---|---|---|
| कुडाळ,<br>ता. कुडाळ | श्री लक्ष्मी व्हेंचर्स प्रा.लि. करीता संचालक<br>राहूल शंकर पाटणकर | ६१ब /६ | ६२६.०० |

सदरचे मिळकती मध्ये निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ वापर करावयाचा असल्याने उपरोक्त वाचले क्र. ०१ अन्वये अर्जदार यांनी वापरात बदल परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी, कुडाळ नगरपंचायत यांनी उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये उक्त मिळकतीमध्ये निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी दिलेली आहे. तसेच मुख्याधिकारी, कुडाळ नगर पंचायत यांनी उपरोक्त वाचले क्र. ०५ अन्वये अहवाल सादर केलेला असून, कुडाळ झोन प्लॅननुसार सदर जागा दाटवस्ती बाहेरील निवासी वापर विभागामध्ये समाविष्ट असून सदर जागेमध्ये निवासी व वाणिज्य वापर अनुज्ञेय आहेत. त्यानुसार अर्जदार यांनी मागणी

केलेनुसार वरील नमुद मिळकतीमध्ये खालील अटी व शर्तीवर निवासी ऐवजी **निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ** वापरात बदल परवानगीस मंजूरी देण्यात येत आहे.

अटी व शर्तीः-

१) सदर परवानगी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम व त्याखालील नियमांना अधिन ठेवून देण्यात येत आहे. **तसेच मुळ बिनशेती आदेशामधील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.**

२) बांधकाम कामी संबंधित प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३) अकृषिक परवानगी ज्या कारणासाठी दिली आहे, त्या कारणासाठीच वापरली पाहिजे. मा. अपर जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय सदर जमिन किंवा तिचा भाग किंवा इमारत कोणत्याही अन्य कारणासाठी वापरता कामा नये.

४) जर अर्जदार सदर आदेशातील कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील तर त्यास सदर कायदयाच्या ठरावान्वये ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र असेल, त्या शिक्षेस बाधा न देता जिल्हाधिकारी जे फर्मावतील त्याप्रमाणे दंड आणि बिनशेती दराने आकारणी त्याने भरली असता सदर बिनशेती प्लॉट अर्जदाराचे भोगवटयास चालू ठेवणेचा अपर जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांस अधिकार आहे.

५) सदरची परवानगी यासंबंधी इतर कोणत्याही लागू असलेल्या व यापुढे लागू होणा-या कायदयास अधिन ठेवून ही परवानगी देण्यात येत आहे. ( उदा. कुळकायदा १९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, नगरपालिका अधिनियम इत्यादी )

६) अर्जदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास महसूल अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल. अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाधा न आणता जिल्हाधिका-यास तो निर्देशित करील, अशी दंड आकारणीची रक्कम उक्त अधिनियमाचे कलम ३२९ चे पोटकलम (२) ला अधिन राहून तो निर्देशित करील, असा दंड भरल्यास उक्त भूखंड अर्जदाराचे ताब्यात ठेवता येईल.

७) उक्त प्रकरणी दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आहे असे आढळून आल्यास मंजूरी रद्द समजण्यात येईल.

( ऐश्वर्या काळुशे )
उपविभागीय अधिकारी
( महसूल) कुडाळ

O/C

प्रत- श्री लक्ष्मी व्हेंचर्स प्रा.लि. करिता संचालक श्री. राहूल शंकर पाटणकर, रा. लक्ष्मीवाडी, कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रतिलिपी- ०१. तहसीलदार कुडाळ / तलाठी कुडाळ यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
०२. उपअधिक्षक भूमी अभिलेख, कुडाळ

( ऐश्वर्या काळुशे )
उपविभागीय अधिकारी
( महसूल) कुडाळ

महसूल सहाय्यक
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कुडाळ

O/C